# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०२/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा गणपती नगर, सिध्दीविनायक गणेश मंदीरा जवळ उमरेड येथे दिनांक २४/०२/२२ चे ११.३० वा. ते ११.४५ वा. दरम्यान आरोपी नामे– पवन मोरेश्वर दडवे वय २२ वर्ष रा. लिना लेआउट गिरड रोड उमरेड हा दुपारी फिर्यादीच्या मोहल्यात विनाकारण फिरतांना दिसुन आला होता. तसेच तो फिर्यादीच्या घराजवळील योगेश लहानुजी लोणारे यांचे घरावर संशईत नजरेने पाहतांना दिसत होता. सदर आरोपी याने योगेश लोणारे यांचे बंद घराचे कंपाउट चे आत प्रवेश करून दरवाज्याला लावलेले कुलुप तोडण्याचा प्रयत्न करून घरातील सामान तोडण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राम तुकाराम तिवाडे वय ६३ वर्ष, रा. गणपती नगर, सिध्दीविनायक गणेश मंदीरा जवळ उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि मनोज वाघ मो. क्र. ९८२२८५२५०१ हे करीत आहे.

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा बुटीबोरी येथे दिनांक २५/०२/२२ चे १३.४५ वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– वैभव विलास ठाकरे वय २१ वर्ष, रा. तारसी ता.जि. नागपुर ही बचत गटाचे २५,०३५/–रू. लाल रंगाचे पिशवीत टाकुन बॅकेत जमा करण्याकरीता घेवुन जात होती. त्यादरम्यान पल्सर वर दोन अज्ञात आरोपी आले व त्यांनी त्याला म्हटले की, 'तुझे पैसे मागे पडले आहे' तेव्हा फिर्यादीने गाडी समोर बाजुला लावली व लाल रंगाची पैसे असलेली पिशवी मोटरसायकलच्या हॅडलला लटकवुन ठेवली व फिर्यादी पैसे उचलण्याकरिता गेला असता सदर दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीची पिशवी उचलुन घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मुन्नासिंग ठाकुर पो.स्टे बुटीबोरी मो.क्र. ८८८८६२२५७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**